# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक २५६/२०२४ दिनांक:- ०५/०७/२०२४.

## Credit card द्वारे ऑनलाईन फसवणुक झालेली १,७१,९७०/-रक्कम तक्रारदार यांना परत करण्यात सायबर पोलीस ठाण्यास यश !!

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील सायबर पोलीस ठाणे येथे तक्रारदार नामे श्री.कालसी यांना त्यांचे मोबाईलवर मॅसेजद्वारे एक लिंक प्राप्त झाली. तक्रारदार यांनी लिंकवर क्लिक केले असता त्याचे मोबाईलमध्ये बँकेचे नाव असलेले अॅप डाऊनलोड झाले. त्यानंतर तक्रारदार यांचे **क्रेडिट कार्डाचे खात्यातुन ३,२५,०००/- रु** कपात झाल्याचा मॅसेज प्राप्त झाला. तक्रारदार यांचे फसवणुकीच्या अनुषंगाने त्यांनी सायबर पोलीस ठाणे येथे तक्रारी अर्ज दिल्याने त्यांची नोंद घेण्यात आलेली आहे.

**(सायबर पोलीस ठाणे आवक अर्ज क्र. १४६५/२०२४ दिनांक २४/०६/२०२४.)**

वरील प्राप्त तक्रारीचे अनुषंगाने तक्रारदार यांचे व्यवहारचे अवलोकन केले असता तक्रारदार यांची रक्कम ऑनलाईन मर्चंट यांचेद्वारे पुढे वर्ग झालेली माहिती प्राप्त झाली. त्यानंतर तक्रारदार यांची वर्ग झालेली रक्कम तात्काळ गोठवुन त्यांचे मुळ खात्यात वर्ग होणेबाबत पत्रव्यवहार करण्यात आला. **त्या अनुषंगाने तक्रारदार यांची फसवणुक झालेल्या रक्कमेपैकी १,७१,९७०/- रु त्यांचे मुळ खात्यावर परत मिळविण्यात आलेली आहे.**

**फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...**

- **अनोळखी लिंक अगर मॅसेज प्राप्त झाल्यास पडताळणी केल्याशिवाय कारवाई करु नये.**
- **कोणत्याही अॅपची पडताळणी केल्याशिवाय डाऊनलोड करु नये.**
- **अनोळखी मोबाईल धारकांना आपली वैयक्तिक माहिती/ आर्थिक व्यवहारासंबंधीत माहिती उघड करु नये. आपले बँक खाते, जन्मदिनांक, OTP वा इतर वैयक्तीक माहीती उघड करू नये.**
- **ऑनलाईन फसवणूक झाल्यास तात्काळ १९३० तसेच www.cybercrime.gov.in वर संपर्क करुन आपली तक्रार नोंदवावी.**
- **ऑनलाईन फसवणूक झाल्यास तात्काळ बँकेला संपर्क करावा.**

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.**

सदरची कामगिरी श्री. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त (परी ०१), श्री. मदन बल्लाळ, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.सुजितकुमार गुंजकर, सपोनि/स्वप्नील वाव्हळ, पोउनि/प्रसाद शेनोळकर,मपोअं/१६१०६ सुवर्णा माळी, पोअं/राहुल बन, पोअं/ विलास खाटीक, पोअं/१७०५३ शुभम कांबळे, मपोहवा/१२००७ माधुरी धिंडे, मसुब/राजेश भरकडे यांनी पार पाडली आहे.

**सायबर फसवणुक हेल्पलाईन क्रमांक :- १९३०**

**सायबर फसवणुक हेल्पलाईन वेबसाईट :- www.cybercrime.gov.in**

**----0000----**